(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

**सर्वोच्च न्यायालयाचा अहवाल [१९६१ ]**

**द स्टेट ऑफ बॉम्बे**

**विरुद्ध**

**परषोत्तम कनैयालाल**

**(न्यायमूर्ती एस. के. दास, न्यायमूर्ती एम. हिदायतुल्ला आणि न्यायमूर्ती एन. राजगोपाल अय्यंगार )**

फौजदारी संपरीक्षा-सक्षम प्राधिकरणाच्या लेखी संमतीशिवाय खटला चालवण्यास प्रतिबंध करणारी संविधी - नामनिर्देशित व्यक्तीच्या नावे संमती असणे आवश्यक आहे का?- अन्न भेसळ कायदा १९५४ (३७/१९५४) मधील कलम २० (आय).

भेसळयुक्त दूध विकल्याबद्दल अन्न निरीक्षकाने उत्तरार्थी विरुद्ध तक्रार दाखल केली होती. या अधिनियमाखालील अपराधांबद्दलचा खटला केंद्र शासन किंवा राज्य शासन अथवा केंद्र शासनाने किंवा राज्य शासनाने या बाबतीत सर्व साधारण किंवा विशेष आदेशाद्वारे प्राधिकृत केलेली व्यक्ती यांच्या खेरीज किंवा त्यांच्या लेखी संमती खेरीज कोणालाही सुरु करता येणार नाही. अन्न निरीक्षकाच्या अर्जावर स्थानिक संस्थेने अधिकृत केलेल्या व्यक्तीने लेखी संमती दिली होती. परंतु प्रतिवादीने असा युक्तिवाद केला की लेखी संमतीचा काही उपयोग झाला नाही कारण ती ज्या व्यक्तीच्या बाजूने देण्यात आली होती त्या व्यक्तीचे नाव त्यात नमूद केलेले नाही.

असे सांगितले गेले की, जेथे सक्षम व्यक्ती किंवा प्राधिकाऱ्याने दिलेल्या लेखी संमतीच्या आधारे खटला सुरू करण्यात आला होता, तेथे संमतीमध्ये तक्रारदाराचे नाव सांगणे

आवश्यक नव्हते. या अधिनियमात तक्रारकर्त्याचे नाव लेखी संमतीमध्ये असणे आवश्यक नाही किंवा तरतूदीचा आवश्यक हेतू म्हणून अशी मर्यादा किंवा अट एकत्र केली जाऊ शकत नाही. लेखी संमती विशिष्ट खटला सुरू करण्यासाठी होती आणि तक्रार दाखल करण्यासाठी त्याला अधिकृत करणाऱ्या तक्रारदाराच्या बाजूने असणे त्यासाठी आवश्यक नव्हते.

**फौजदारी अपिल न्यायाधिकारक्षेत्र : फौजदारी अपील क्रमांक ५६/१९५९.**

फौजदारी अपील क्रमांक ३३/१९५७ मधील बडोदा सत्र न्यायालयाच्या ७ जून १९५७ च्या निकाल आणि आदेशातून उद्भवलेल्या, फौजदारी पुनरीक्षण क्रमांक १६७१/१९५७ मधील पूर्वीच्या मुंबई उच्च न्यायालयाच्या १८ डिसेंबर १९५७ च्या निकाल आणि आदेशावरून विशेष अनुमती अपील.

**अपीलकर्त्यासाठी उपस्थित वकील : एच. आर. खन्ना आणि डी. गुप्ता,**

**उत्तरार्थीसाठी वकील : जी. सी. माथूर**

**३१ ऑगस्ट १९६०**

**न्यायनिर्णय न्यायमूर्ती श्री अय्यंगार यांच्याद्वारे दिला गेला-**

या न्यायालयाच्या विशेष अनुमतीद्वारे केलेले हे अपील अन्न भेसळ प्रतिबंधक कायदा, १९५४ (३७/१९५४) कलम २० (१) च्या संरचनेसंदर्भात एक अतिशय लहान मुद्दा उपस्थित करते.

उत्तरार्थीचे बडोदा महानगरपालिकेच्या हद्दीत दुधाचे दुकान आहे. नगरपालिकेच्या अन्न निरीक्षकांनी ९ जुलै १९५६ रोजी दुकानाला भेट देऊन विश्लेषणासाठी दूध खरेदी केले. हे नमुने सार्वजनिक विश्लेषकाकडे पाठवण्यात आले आणि तेव्हा त्यांचा अहवाल असा होता की, सदर

नमुना हा भेसळयुक्त आहे, तेव्हा निरीक्षकाने मुख्य अधिकारी, बडोदा नगरपालिका प्रशासन यांच्याकडे, उत्तरार्थीविरुद्ध अन्न भेसळ प्रतिबंधक अधिनियम, १९५४ (यापुढे अधिनियम म्हणून संदर्भित) अंतर्गत फौजदारी कारवाई सुरू करण्याच्या संमतीसाठीचा अर्ज केला. या खटल्याच्या प्रारंभीस मुख्याधिकाऱ्यांनी लेखी संमती दिली होती आणि त्यानंतर ज्या तक्रारीवरून हे अपील उद्भवते त्या तक्रारीवर प्रतिवादीविरुद्ध भेसळयुक्त अन्न विकणे या कारणास्तव उक्त कायद्याच्या कलम १६ सह कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

विशेष न्याय दंडाधिकारी, प्रथम वर्ग, बडोदा यांनी या प्रकरणाची संपरीक्षा केली. आपला अपराध नाकारण्या ऐवजी, आरोपीने विविध तांत्रिक आक्षेप नोंदवले, ज्याचे मुख्य कारण हे होते की अधिनियमाच्या कलम २० (१) च्या अटींचे पालन न केल्यामुळे फिर्यादी सक्षम ठरले नाहीत. ह्या तरतुदीमध्ये, ज्याचा संदर्भ घेणे अनावश्यक आहे ते परंतुक वगळले जे :

"या अधिनियमाखालील अपराधांबद्दल राज्य सरकार किंवा स्थानिक प्राधिकरण किंवा राज्य सरकार किंवा स्थानिक प्राधिकरणाद्वारे प्राधिकृत केलेल्या व्यक्ती यांच्या खेरीज किंवा लिखित संमतीशिवाय कोणताही खटला सुरु करता येणार नाही."

दंडाधिकाऱ्यांनी हे आक्षेप फेटाळले आणि आरोपीला सदर गुन्ह्यासाठी दोषी ठरवत रुपये ३००/- दंड भरण्याची आणि तसे न केल्यास तीन महिन्यांसाठी कठोर तुरुंगवासाची शिक्षा सुनावली . केवळ ज्या कायद्याशी आम्ही संबंधित आहोत त्या कायद्याच्या कलम २० (१) वर आधारित आक्षेपाबाबत, विद्वान दंडाधिकाऱ्यांनी असे प्रतिपादित केले की:

प्रस्तूत प्रकरणात बडोदा महानगरपालिका हे स्थानिक प्राधिकरण आहे आणि त्यांनी ७ मे १९५६ रोजीच्या ठराव क्रमांक २२२ द्वारे या कायद्यांतर्गत कार्यवाही सुरू करण्यास सुरु करण्यासाठी नगरपालिकेने मुख्याधिकारी आणि आरोग्य अधिकारी यांना प्राधिकृत करण्यास

मंजुरी दिली आहे, तसेच मुख्य अधिकाऱ्यांना १३ ऑक्टोबर १९५६ रोजी उक्त अधिनियमांतर्गत सदर आरोपींविरुद्ध तक्रार दाखल करण्यासाठी लेखी संमती दिली आहे. सदर लेखी संमती हि निशाणी १०/७ च्या अभिलेखावर असून मुख्याधिकारी आणि आरोग्य अधिकारी यांना अधिकार देणाऱ्या नगरपालिकेच्या ठरावाची प्रत देखील निशाणी १८/८ च्या अभिलेखावर आहे. अशा प्रकारे प्रस्तूत प्रकरणात सदर आरोपीविरुद्ध ह्या अधिनियमांतर्गत कार्यवाही करण्यासाठी बडोदा महानगरपालिकेने या संदर्भात प्राधिकृत केलेल्या मुख्य अधिकाऱ्यानी वैध लेखी संमती दिली आहे. स्थानिक प्राधिकरणाने अथवा स्थानिक प्राधिकरणाने या संदर्भात प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने लेखी संमती दिल्यास अन्न निरीक्षक उक्त कायद्यांतर्गत तक्रार दाखल करू शकतात. प्रस्तूत प्रकरणात अन्न निरीक्षक ज्यांना सदर आरोपींविरुद्ध तक्रार दाखल करण्यापूर्वी आवश्यक लेखी संमती देण्याचे अधिकार नगरपालिकेने प्रदान केले आहेत त्यांनी सर्व कागदपत्रे मुख्य अधिकाऱ्याकडे सादर केली होती आणि ही कागदपत्रे पाहिल्यानंतर मुख्य अधिकाऱ्याने त्यांना ही तक्रार दाखल करण्यासाठी योग्य ती संमती दिली होती.हे खरे आहे की संमतीवर अन्न निरीक्षकाचे नाव नसते परंतु हे सूचित करते की संमती मुख्य अधिकाऱ्याने त्या व्यक्तीला दिली होती, म्हणजे तक्रारदार अन्न निरीक्षक ज्यांनी परवानगी मागितली होती आणि अन्य कोणीही नाही.

त्याच्या दोषसिद्धी व शिक्षेविरुद्ध उत्तरार्थीने बडोदा येथील सत्र न्यायालयात अपील दाखल केले. उक्त अधिनियमाच्या कलम २० (१) अन्वये कारवाई करण्यास अन्न निरीक्षक सक्षम नसल्याच्या आधारावर अपीलीय न्यायालयाने दोषी ठरवण्याचा आणि शिक्षेचा आदेश बाजूला सारला . 'कन्ननूर दूध पुरवठा सहकारी संस्था' या प्रकरणामध्ये [(१९५६) २ MLJ. ४६५] मद्रास उच्च न्यायालयाच्या एकल न्यायाधीशाच्या निर्णयावर भर देऊन, विद्वान सत्र न्यायाधीशांनी असे प्रतिपादित केले की, उक्त कलमाच्या अटींनुसार, ज्याच्या "लिखित संमतीने"

खटला चालवला जातो तो एकमेव अधिकार राज्य सरकारला असून स्थानिक प्राधिकारी किंवा राज्य सरकार किंवा स्थानिक प्राधिकरणाने त्या वतीने प्राधिकृत केलेली व्यक्ती, खटला सुरू करण्यासाठी "लिखित संमती" देण्यास सक्षम नाहीत. त्यामुळे त्याने दोषसिद्धी आणि शिक्षा बाजूला सारली आणि उत्तरार्थीस दोषमुक्त केले.

त्यानंतर राज्याने हे प्रकरण मुंबई उच्च न्यायालयात दाखल केले आणि नंतर त्याचे फौजदारी पुनरीक्षण याचिकेत रूपांतरित केले. उच्च न्यायालयाच्या विद्वान न्यायाधीशांनी सत्र न्यायालयाच्या विद्वान न्यायाधीशांनी दिलेल्या आदेशाला दुजोरा दिला. राज्य सरकारव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्राधिकरणाच्या लेखी संमतीने खटला चालवला जाऊ शकत नाही या सत्र न्यायाधीशांनी कलम २० (१) च्या लावलेल्या अर्थाशी ते सहमत नव्हते. तथापि, त्यांनी असे मानले की 'लेखी संमती' मध्ये तक्रार दाखल करू शकणाऱ्या व्यक्तीचे नाव असणे आवश्यक आहे आणि प्रस्तूत प्रकरणात 'लेखी संमती' मध्ये तक्रार दाखल करण्यासाठी प्राधीकृत व्यक्ती म्हणून अन्न निरीक्षकाचे नाव दिले नसल्यामुळे, कायदेशीररित्या कार्यवाही सुरू झाली नाही. उच्च न्यायालयाच्या या निर्णयावरूनच मुंबई राज्याने या न्यायालयाची विशेष अनुमती घेऊन हे प्रकरण आमच्यासमोर आणले आहे.

यात कोणताही वाद नाही की "स्थानिक प्राधिकरण" बडोदा नगरपालिकेने, मुख्य अधिकाऱ्यांना उक्त अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये कायद्यातील अपराधांबद्दल तक्रार दाखल करण्यासाठी संमती देण्याचे अधिकार दिले होते. तसेच याबाबतही वाद नाही की, दिनांक १३ ऑक्टोबर १९५६ रोजी मुख्याधिकाऱ्यांनी उत्तरार्थीविरुद्ध ही तक्रार दाखल करण्यासाठी "लिखित संमती" दिली होती. 'संमती' ही खालील अटींमध्ये आहेः

" बडोदा नगरपालिक प्रशासनाच्या मुख्य अधिकाऱ्याकडे असलेल्या अधिकाराखाली.. भारत सरकारच्या अन्न भेसळ प्रतिबंधक अधिनियम, १९५४ च्या तरतुदींचे उल्लंघन केल्याबद्दल खालील दूध विक्रेत्यांविरुद्ध खटला चालवण्यासाठी याद्वारे मंजुरी दिली जात आहे . "

त्यानंतर उत्तरार्थीचे नाव, त्याचा पत्ता आणि गुन्ह्याची तारीख नंतर निश्चित केली जाते आणि त्यानंतर एक परिच्छेद आहे जो खालील प्रमाणे: दूध विश्लेषण अहवाल आणि इतर संबंधित कागदपत्रे तपासून तसेच अन्न भेसळ प्रतिबंधक कायदा, १९५४ च्या कलम २० नुसार वरील प्रत्येक व्यक्तीने केलेल्या गुन्ह्याचे स्वरूप तपासल्यानंतर ही अनुशास्ती देण्यात येत आहे.

आम्ही प्रारंभीच हे सूचित करतो की, उक्त अधिनियमाच्या कलम २० (१) च्या अटींनुसार केवळ राज्य सरकारच्या लेखी संमतीनेच नव्हे तर "स्थानिक प्राधिकरण " किंवा "राज्य सरकारने किंवा स्थानिक प्राधिकरणाने या संदर्भात प्राधिकृत केलेल्या व्यक्तीच्या" लेखी संमतीने खटला चालवला जाऊ शकतो, या उच्च न्यायालयाच्या विद्वान न्यायाधीशांच्या मताशी आम्ही पूर्णपणे सहमत आहोत. आमच्या मते, उपकलमाच्या भाषेत इतर कोणतीही विवेचनाची शक्यता दिसत नाही.उच्च न्यायालयाच्या विद्वान न्यायाधीशांनी असे प्रतिपादित केले आहे की, विद्वान सत्र न्यायाधीशांनी प्रतिपादित केलेल्या संरचनेमध्ये त्यांनी दोन स्वल्पविरामांकडे दुर्लक्ष केलेले दिसते, जे कलमामधील "अथवा लेखी संमतीने " या खंडाच्या आधी आणि नंतर आलेले आहे. यापैकी एक स्वल्पविराम आधी येतो आणि दुसरा "अथवा लेखी संमतीने" या अभिव्यक्तीनंतर येतो या कलमाचा साधा व्याकरणात्मक अर्थ असा आहे की लेखी संमती राज्य सरकार अथवा स्थानिक प्राधिकरणाची किंवा राज्य सरकार अथवा स्थानिक प्राधिकरणाने त्या वतीने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीची असू शकते. आमच्या मते, या कलमांतर्गत, (१) राज्य सरकारद्वारे, (२) स्थानिक प्राधिकरणाद्वारे (३) राज्य सरकारने त्या वतीने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीद्वारे किंवा (४) स्थानिक प्राधिकरणाने अशाच प्रकारे प्राधिकृत केलेल्या व्यक्तीद्वारे

खटला चालवला जाऊ शकतो. तसेच , या चारपैकी कोणत्याही प्राधिकरणाच्या संमतीने खटला देखील चालवला जाऊ शकतो.

दोन स्वल्पविरामांशिवाय, कन्ननूर दूध पुरवठा सहकारी संस्था [(I) (१९५६) २ MLJ ४६५] या प्रकरणामध्ये मद्रास उच्च न्यायालयाच्या विद्वान न्यायाधीशांनी ज्या संरचनेला अनुकूलता दर्शविली, ते उपकलम या अटींमध्ये पुनर्लिखित केल्याशिवाय ते शक्य होणार नाही जी खालील प्रमाणे आहे : ...... राज्य सरकारच्या लेखी संमतीने किंवा स्थानिक प्राधिकरणाद्वारे अथवा राज्य सरकार किंवा स्थानिक प्राधिकरणाद्वारे या संदर्भात प्राधिकृत केलेल्या व्यक्तीद्वारे चालवला जाईल.""स्थानिक प्राधिकरण" या शब्दांसमोर "द्वारे" हा शब्द अंतर्भूत केल्याशिवाय, स्थानिक प्राधिकरणाच्या लेखी संमती या उपकलमाच्या मजकुरातून वगळणे शक्य होणार नाही.

आधीच नमूद केल्याप्रमाणे, तथापि, ज्या तर्काद्वारे उच्च न्यायालयाच्या विद्वान न्यायाधीशांनी फिर्यादीपक्ष सक्षम नाहीत हे ठरवले ते हे होते की "लेखी संमती" या अटींमध्ये, ज्या व्यक्तीच्या बाजूने शास्ती किंवा "लेखी संमती" देण्यात आली होती त्या व्यक्तीचे नाव दिले गेले नव्हते.विद्वान न्यायाधीशांनी असे निवेदन केले आहे की:

" ज्या व्यक्तीला अशी मंजुरी किंवा संमती दिली गेली आहे त्या व्यक्तीचा उल्लेख न करता, प्रस्तूत प्रकरणात आमच्या समक्ष ज्या स्वरूपाची लेखी मंजुरी किंवा लेखी संमती आहे, ती आमच्या मते, मंजुरीच्या अटींचे पुरेसे पालन करणारी नाही. प्रस्तूत लेखी संमतीमध्ये खटला चालवण्यास सक्षम व्यक्ती म्हणून अन्न निरीक्षकाचे नाव नमूद केलेले नाही आणि म्हणूनच आपण असे मानले पाहिजे की खटला सुरु करणे हे त्यांच्या अधिकारक्षेत्राबाहेरची बाब होती.

अपीलकर्ता-राज्याच्या विद्वान वकिलानी या विवेचनाच्या योग्यतेला आव्हान दिले.त्यांनी आम्हाला फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १९७ वर दिलेल्या निर्णयांच्या तर्कसंगत मुद्द्यांचा संदर्भ दिला, ज्यामध्ये असे म्हटले गेले आहे की ज्या व्यक्तीद्वारे खटला चालवता येईल त्या व्यक्तीचे नाव 'मंजुरी' मध्ये असण्याची आवश्यकता नाही. आमच्या मते फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १९७ आणि अन्न भेसळ प्रतिबंधक कायद्याच्या कलम २० (१) च्या भाषेच्या सापेक्ष व्याप्ती प्रतिपादित करणे अनावश्यक आहे. आम्ही आमचा निर्णय कलम २० (१) च्या अटींवरच ठेवण्यास प्राधान्य देतो. सुरुवातीला, संविधीमध्ये असे विहित केलेले नाही की तक्रारदाराचे नाव 'लेखी संमती' मध्ये दिले जाईल.म्हणूनच, एकमात्र प्रश्न असा आहे की तरतूदीचा एक आवश्यक हेतू म्हणून अशी मर्यादा किंवा अट एकत्रित केली जाऊ शकते का? प्रथमतः, नियमा मागचे कारण अशी स्थिती सुचवू शकत नाही किंवा ध्वनित करू शकत नाही. हा नियम निःसंशयपणे व्यापाऱ्यांविरुद्ध क्षुल्लक किंवा त्रासदायक खटले सुरू होण्यापासून रोखण्यासाठी तयार करण्यात आला आहे.त्यामुळे त्यात अशी तरतूद करण्यात आली आहे की, तक्रार नामनिर्देशित किंवा निर्दिष्ट प्राधिकरणाद्वारे किंवा अशा प्राधिकरणाच्या लेखी संमतीने केली जावी.लेखी संमती देण्यापूर्वी, खटला सुरू करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकरणाने खटल्याच्या तथ्यांवर विवेकबुद्धी वापरली पाहिजे आणि न्यायालयासमोर कथित आरोपीला उपस्थित केल्याबद्दल प्रथमदर्शनी खटला अस्तित्वात आहे असे स्वतःला पटवून दिले पाहिजे, असे सूचित करणे वाजवी दिसते, परंतु लेखी संमतीमध्ये तक्रारदाराचे नाव असणे आवश्यक आहे असा पुढील सूचितार्थ, आमच्या मते, अनुसरण करत नाही. प्रस्तूत प्रकरणात, विश्लेषकांचा अहवाल आणि संबंधित कागदपत्रे मुख्य अधिकारी यांच्या समोर होते ज्यासाठी लेखी संमती किंवा मंजुरी देण्यात आली होती. दुसरे, उपकलमातच असे सूचित होते की लेखी संमती ही विशिष्ट खटला सुरू करण्यासाठी आहे आणि तक्रा दाख करण्यास प्राधिकृत केलेल्या

तक्रारदाराच्या "पक्षात" नाही. राज्य सरकार आणि 'स्थानिक प्राधिकरण' जे स्वतःहून खटला सुरू करण्यास सक्षम आहेत अशा तरतुदीत निर्दिष्ट केलेले आहेत, प्रसंगी त्यांना वगळून, या दोन प्राधिकरणांनी 'प्राधिकृत' केलेल्या व्यक्तींचा यात आणखी समावेश केला गेला आहे. "च्या वतीने प्राधिकृत व्यक्ती" ही अभिव्यक्ती स्पष्टपणे असे नाव असलेल्या व्यक्तीचा संदर्भ देते जे प्राधिकृत केले गेले आहे.या चार श्रेण्यांच्या बाबतीत, तक्रार दाखल करणाऱ्या प्राधिकरणाने किंवा व्यक्तीने स्वतः खटल्यातील वाजवीपणा आणि औचित्य विचारात घेणे आवश्यक आहे आणि खटला शुल्लक  नसून ते आव्हानीत करण्यास योग्य असल्याबद्दल समाधान करून देणे आवश्यक आहे. पुढे इतर बाबींमध्ये , संबंधित शब्द असे आहेत "लेखी संमती खेरीज ---- कुठलाही खटला ------ चालवला जाणार नाही " येथे, खटला चालवणाऱ्या व्यक्तीच्या संमतीवर नव्हे, तर खटला चालवण्याच्या संमतीवर भर दिला जातो.  या प्रस्तूत प्रकरणात अभियोगाची इष्टता आणि योग्यता तपासण्यासाठी तथ्यांची प्राथमिक तपासणीकामी  हे दिसून येते की ,जबाबदारी हि लेखी संमती देणाऱ्या व्यक्तीची किंवा प्राधिकरणाची आहे - तक्रारदार असणाऱ्या व्यक्तीची नाही. सद्यस्थितीत इथे दोन वेगळे वर्ग आहेत आणि दोन प्रकारच्या अधिकारांचे हस्तांतरण निर्दिष्ट करण्यासाठी भिन्न वाक्यांशांचा वापर असे संकेत दर्शिवितात की दुसऱ्या श्रेणीतील प्रकरणांमध्ये-जेथे सक्षम व्यक्ती किंवा प्राधिकरणाने दिलेल्या लेखी संमतीच्या आधारे खटले चालवले जातात, तक्रारदाराच्या नावाचे स्पष्टीकरण ही वैधानिक आवश्यकता नाही-संमती ही विशिष्ट अभियोगासाठी असते. म्हणून, आम्ही असे मानतो की प्रस्तूत प्रकरणातील अभियोग एका तक्रारीवर सुरू करण्यात आला होता ज्याने अधिनियम १९६० च्या कलम २० (१) च्या आवश्यकतांची पूर्तता केली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या विद्वान न्यायाधीशांच्या युक्तिवादाचा एक भाग असा होता की, जर लेखी संमतीत व्यक्तींचे नाव नसेल तर  "स्थानिक प्राधिकरणा" चे नियंत्रण नसलेल्या व्यक्तींकडून तक्रार दाखल केली जाऊ शकते

आणि म्हणून या कारणास्तव कलम २० (१) मधील विवेचनाचा अवलंब करणे आवश्यक होते, म्हणजेच लेखी संमतीद्वारे तक्रार दाखल करण्यासाठी प्राधिकृत व्यक्तीचे नाव असणे आवश्यक आहे. आमच्या मते, ही भीती न्याय्य नाही, कारण तक्रारीची दखल घेता यावी यासाठी तक्रारदाराने लेखी संमती दाखल करावी लागते आणि दंडाधिकाऱ्यांसमोर दाखल करण्यासाठी लेखी संमती सर्वांसाठी उपलब्ध असेल असे वाटत नाही. याशिवाय, उच्च न्यायालयाच्या विद्वान न्यायमूर्तींच्या तर्कानुसार तक्रार दाखल करण्यासाठी प्राधिकृत म्हणून ज्या व्यक्तीचे नाव असू शकते त्यावर कोणतेही बंधन नाही. सामान्यतः, अर्थातच, नामनिर्देशित व्यक्ती नगरपालिकेचा अधिकारी असली पाहिजे, परंतु सैद्धांतिकदृष्ट्या अशी शक्यता आहे की नामनिर्देशित व्यक्ती कदाचित नगरपालिका कर्मचारी नसेल आणि जर 'लेखी संमती' अशा व्यक्तीच्या बाजूने दिली गेली असेल तर नगरपालिका प्राधिकरणाचे त्याच्यावर कोणतेही प्रशासकीय नियंत्रण नसेल. स्थानिक प्राधिकरणाने दिलेल्या लेखी संमतीमध्ये एखाद्या व्यक्तीचे नाव दिले असले तरीही, विद्वान न्यायाधीशांनी नमूद केलेली गुंतागुंत अजूनही तशीच असेल. म्हणून, आम्ही असे मानतो की ही अशी परिस्थिती नाही ज्यामुळे कलम २० (१) अंतर्गत तक्रारदाराचे नाव "लेखी संमती" मध्ये असणे आवश्यक आहे.

या न्यायालयासमोर उतरार्थीचे प्रतिनिधित्व केले गेले नाही आणि प्रकरणाचे महत्त्व लक्षात घेऊन न्यायालयाने श्री. जी. सी. माथूर यांना न्यायमित्र म्हणून हजर राहण्याची विनंती केली होती आणि त्यांनी आम्हाला दिलेल्या मदतीबद्दल आम्ही त्यांचे आभार मानतो.

त्यानुसार अपीलास परवानगी देण्यात येत आहे तसेच उच्च न्यायालयाचा आदेश बाजूला सारला जात असून दंडाधिकाऱ्यांचा आदेश पुनर्स्थापित करण्यात येत आहे. अपील मान्य करण्यात येत आहे.

**X-X-X-X**

## अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

**X-X-X-X**